www. sahyandrinews.com

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १९७ • Title - Code :- MAHMAR49513 • शुक्रवार दि.१९ एप्रिल २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Scan QR code to visit... Epaper Portal

Scan QR code to visit... Epaper Portal

### राज्यातील राजकीय परिस्थितीला शरद पवार जबाबदार

## पवारांकडून वेळोवेळी भूमिका बदलून राजकारण-दिपक केसरकर

**मुंबई (वृत्तसंस्था)**–राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते शरद पवार हे सध्याच्या राजकीय परिस्थितीला कारणीभूत आहेत, असा आरोप शिवसेना नेते मंत्री दिपक केसरकर यांनी केला. भाजप, अजित पवार यांना व्हिलन करायचे आणि आपणच शिवसेनेचे तारणहार आहोत, असे चुकीचे चित्र शरद पवारांविषयी तयार होत आहे जे चूक आहे, असे केसरकर यांनी सांगितले. आज पार पडलेल्या महायुतीच्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. सामान्य शिवसैनिक जो बाळासाहेबांनी घडवला त्याच्यापर्यंत योग्य भूमिका पोहचणे आवश्यक आहे. बाळासाहेबांचा विचार कायम ठेवण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात इतिहास घडवला. मात्र शरद पवारांनी वेळोवेळी भूमिका बदलून राजकारण केले. बाळासाहेब ठाकरे आणि शरद पवार यांनी एकमेकांविरोधात बोलायचे नाही, असे १९८९ मध्ये ठरवले होते. बाळासाहेबांनी आयुष्याच्या शेवटपर्यंत हा शब्द पाळला. परंतु शिवसेनेच्या बाबत वेगळेच घडले. शिवसेनेत तीन चार वेळा फूट पडली, त्यामध्ये शरद पवार यांची प्रमुख भूमिका होती, असा आरोप केसरकरांनी केला.

राज्यात २०१९ मधील निवडणुकीनंतर शरद पवारांनी न मागता भाजपला पाठिंबा दिला होता. यामुळे शिवसेनेची बार्गेनिंग पॉवर कमी केली. त्या दिवसापासून शिवसेनेला संपवण्याची सुरुवात झाली, असे केसरकर यांनी सांगितले. २०१७ मध्ये भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात अनेक बैठका झाल्या. यात कोण मंत्री असावे इतके सूक्ष्म नियोजन झाले होते. याचा प्रस्ताव जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे अंतिम मंजुरीसाठी पाठवला तेव्हा मोदींनी सांगितले की, राष्ट्रवादीला सोबत घेण्यास हरकत नाही पण शिवसेना कुठल्याही परिस्थितीत सत्तेत असली पाहिजे. मोदींनी नेहमीच शिवसेनेला सोबत ठेवले मात्र उद्धव ठाकरेंकडून आज मोदींना विरोध केला जात आहे, असे त्यांनी सांगितले.



याउलट शरद पवारांनी शिवसेना जर सत्तेत असेल तर आम्ही भाजपसोबत येणार नाही, अशी उघड भूमिका घेतली होती. पवारांना आज शिवसैनिकांची मदत हवीय पण त्यांच्या मनात शिवसेना संपवायची हा विचार आहे, असा आरोप केसरकरांनी केला. महाविकास आघाडी सरकारवेळी उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री करताना शरद पवार यांनी घेतलेली भूमिका अयोग्य होती. एकनाथ शिंदे यांच्या हाताखाली ज्येष्ठ नेते काम करणार नाहीत, अशी पवारांनी भूमिका घेतली होती, मात्र आजच्या घडीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बरोबरीने राज्यात अनेक वरिष्ठ नेते काम करत आहेत, असे त्यांनी सांगितले.कुटुंबांत फूट पाडण्याचा आरोप शरद पवार करतात, मात्र ही गोष्ट अनेकवेळा त्यांच्यामुळेच घडली आहे, असे केसकरांनी सांगितले. शिवसेना ही गोरगरिबांसाठी धावून जाणारी संघटना आहे. त्यामुळे राज्यात शिवसेना टिकली पाहिजे.ज्या दिवशी काँग्रेससोबत जाण्याची वेळ येईल, तेव्हा मी राजकारण सोडेन इतके सुस्पष्ट विचार बाळासाहेब ठाकरे यांचे होते. अजित दादांना कुठेतरी व्हिलन करायचे आणि स्वत: हिरो बनायचे ही भूमिका योग्य नाही. गेल्या १५ ते २० वर्षात राज्यात अनेक तरुण नेते तयार झालेत. ज्यात देवेंद्र फडणवीस, अजित पवार तयार झाले. या तरुण नेत्यांची फळी कापून काढायची असा शरद पवारांचा विचार आहे. शरद पवार राज्यातील ज्येष्ठ नेते आहेत. त्यांनी चांगल्या कामाला आशिर्वाद देणे अपेक्षित आहेत. त्यांनी अशा प्रकारचे राजकारण करणे जे महाराष्ट्राच्या हिताचे नाही, असे केसरकर म्हणाले.

## यंग चांदा ब्रिगेड कार्यालयात मतदार सहायता केंद्राची सुरुवात

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

उद्या होत असलेल्या लोकसभा मतदानात मतदारांचा टक्का वाढविण्यासाठी आणि मतदारांना येणाऱ्या अडचणी समजून यंग चांदा ब्रिगेडच्या कार्यालयात मतदार सहायता केंद्राची सुरुवात करण्यात आली आहे.

उद्या लोकसभा निवडणुकीत पहिल्या टप्प्यातील निवडणुका होत आहे, या मध्ये चंद्रपूर वणी आर्णी लोकसभेचा मतदार संघासाठी उभ्या असलेल्या उमेदवारांसाठी निवडणूक पार पडणार आहे. या निवडणूकीत जास्तीत जास्त मतदारांनी आपला हक्क बजावावा आणि हक्क बजावताना त्यांना अडचणी न येण्यासाठी यंग चांदा ब्रिगेडच्या जैन भवन जवळील कार्यालयात मतदार सहायता केंद्राची सुरुवार करण्यात आली. या मतदार सहायता केंद्राचा उद्देश मतदारांना मतदानाशी संबंधित माहिती आणि मदत पुरवणे हा आहे. केंद्रात मतदार यादी तपासणे, मतदान केंद्राचा शोध घेणे आणि इतर अनेक सुविधा उपलब्ध असतील. या केंद्राला मतदारांनी पसंती दर्शवित आपले मतदार यादीतील नाव शोधून नेत आहे. मतदारांचे नाव व मतदान केंद्र माहिती करण्यासंदर्भात काही अडचण भासल्यास यंग चांदा ब्रिगेड सहायता केंद्राशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## आरटीओ कार्यालयाच्या कामकाज वेळेत बदल

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील तापमान वाढ होत असल्यामुळे उष्माघातामुळे कोणीही बाधित होऊ नये. करिता कार्यालयातर्फे करण्यात येणारे वाहन योग्यता प्रमाणपत्र तपासणी, पक्की अनुज्ञप्ती चाचणी विषयक कामकाज दि.२२.०४.२०२४ पासून सकाळी ७.०० ते १२.०० वाजेपर्यंत व दुपारी ४.००ते ६.०० वाजेपर्यंतच्या कालावधीत करता येणार आहे. तरी सर्व वाहन चालकांनी याची नोंद घ्यावी, असे किरण मोरे, प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी कळविले आहे.

## राम नवमी निमित्त निघालेल्या शोभा यात्रेचे यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने स्वागत

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राम नवमी निमित्त शहरातून निघालेल्या भव्य शोभायात्रेचे यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी यंग चांदा ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष तथा चंद्रपूर विधानसभा क्षेत्राचे आमदार किशोर जोरगेवार यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. यावेळी शोभायात्रेत सहभागी झालेल्या रामभक्तांना यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने शितपेयाचे वितरण करत राम नवमीच्या शुभेच्छा देण्यात आल्यात.

यावेळी यंग चांदा ब्रिगेडचे यंग चांदा ब्रिगेड च्या महिला शहर संघटिका वंदना हातगावकर, सविता दंडारे, सायली येरणे, भाग्यश्री हांडे, आशा देशमुख, कल्पना शिंदे, वैशाली मेश्राम, दुर्गा वैरागडे, विमल कातकर, सोनाली आंबेकर,





अस्मिता डोणारकर, शुभांगी डोंगरवार, वैशाली मद्दीवार, आशु फुलझेले, युवा नेते अमोल शेंडे रोशेद हुसेन,चंद्रशेखर देशमुख, नकुल वासमवार, विश्वजीत शाहा, हेरमन जोसेफ, गौरव जोरगेवार, करणसिंह बैस, राम जंगम, नितेश गवळी, आदींची उपस्थिती होती.दरवर्षी प्रमाणे यंदाही राम नवमी निमित्त भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. सदर शोभायात्रा गांधी चौकात पोहचताच आमदार किशोर जोरगेवार यांच्या उपस्थितीत यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने शोभायात्रेचे स्वागत करण्यात आले. यावेळी शोभायात्रेतील श्री प्रभु राम यांच्या प्रतिमेला आमदार किशोर जोरगेवार यांनी पुष्पहार अर्पण करुन पुजा केली. या प्रसंगी शोभायात्रेत सहभागी झालेल्या रामभक्तांसाठीही यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने पिण्याचे पाणी आणि शितपेयाची व्यवस्था करण्यात आली होती. शोभायात्रेचे स्वागत केल्यानंतर आमदार किशोर जोरगेवार आणि यंग चांदा ब्रिगेडचे कार्यकर्तेही शोभायात्रेत सहभागी झालेत.

## चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात १८ लक्ष ३७ हजार ९०६ मतदार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाची निवडणूक १९ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत होणार आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासनाने पूर्ण तयारी केली असून चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात एकूण १८ लक्ष ३७ हजार ९०६ मतदार आहे. यात ९ लक्ष ४५ हजार ७३६ पुरुष मतदार, ८ लक्ष ९२ हजार १२२ स्त्री मतदार तर ४८ इतर मतदार आहेत.

चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात ७० – राजुरा, ७१ – चंद्रपूर, ७२ – बल्लारपूर, ७५ – वरोरा, ७६ – वणी आणि ८० – आर्णि या विधानसभा मतदारसंघाचा समावेश होतो. राजूरा मतदारसंघात ३३० मतदान केंद्र, चंद्रपूर मतदारसंघात ३८३ मतदान केंद्र, बल्लारपूर मतदारसंघात ३६१ मतदान केंद्र, वरोरा मतदारसंघात ३४० मतदान केंद्र, वणी मतदारसंघात ३३८ मतदान केंद्र तर आर्णि मतदारसंघात ३६६ मतदान केंद्र असे एकूण २११८ मतदान केंद्र आहेत. या सर्व मतदान केंद्रावर मतदानाचे संपूर्ण साहित्य घेऊन पोलिंग पार्टी रवाना झाल्या आहेत.





टोकन सुविधा : उन्हाचा तडाखा लक्षात घेता मतदान केंद्रावर मतदारांकरीता निवारा / प्रतिक्षालय तयार करण्यात आले आहे. तसेच मतदान केंद्रावर गर्दीची परिस्थिती उद्भवून मतदारांना अडचण होणार नाही, याकरीता टोकन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

दिव्यांग व्यक्तिंसाठी उपाययोजना : जिल्ह्यातील प्रत्येक मतदान केंद्रावर दिव्यांग मतदाराकरीता त्यांच्या मागणीच्या अनुषंगाने व्हीलचेअरची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच प्रत्येक मतदान केंद्रावर जिल्हा प्रशासनाकडून मतदारांच्या मदतीकरीता मदतनीस / स्वयंसेवकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

### श्रीराम जन्मोत्सव शोभायात्रेनिमित्त

## कमल स्पोर्टींग क्लब चंद्रपूरच्या वतीने भाविकांना बुंदी वितरण

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

प्रभु श्रीराम जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त दि. १७ एप्रिल २०२४ रोजी समाधीवार्डातील श्री काळाराम मंदीर येथून श्रीराम मुर्तीची भव्य शोभायात्रा काढण्यात आली. सदर शोभायात्रा मंदीर परिसरापासून ते गांधी चौक जटपुरा गेट-कस्तुरबा रोड मार्गे-गिरनार चौक ते काळाराम मंदीर येथे विसर्जित करण्यात आली. या शोभायात्रेत रथावर विराजमान प्रभु श्रीरामजींच्या मुर्तीचे पुजन, माल्यार्पण व शोभायात्रेचे भव्य स्वागत कमल स्पोर्टींग क्लबचे जिल्हाध्यक्ष युवा नेते रघुवीर अहीर यांनी व उपस्थितांनी केले. दरवर्षीप्रमाणे यंदाही स्पोर्टींग क्लबच्या वतीने रामभक्त व भाविकांसाठी बुंदा वाटप कार्यक्रम रघुवीर अहीर यांच्या प्रमुख मार्गदर्शनात पार पडले. या कार्यक्रमाचा लाभ शेकडो नागरिकांनी घेतला.



या कार्यक्रमास महानगराचे माजी उपमहापौर अनिल फुलझेले, माजी नगरसेवक राजेंद्र अडपेवार, भाजपा ओबीसी आघाडीचे प्रदेश सदस्य विनोद शेरकी, राहुल गायकवाड, राजेश वाकोडे, विशाल गिरी, मयुर बोकडे, चेतन शर्मा, अक्षय ठक्कर, सुदामा यादव, प्रविण चुनारकर, अक्षय सोनी, कमल कजलीवाले, राजवीर चौधरी, विपीन मेंढे, कृपेश बडकेलवार, अक्षय चंदनखेडे, प्रज्वल गिलबिले यांचेसह कमल स्पोर्टींग क्लबचे सदस्य उपस्थित होते.

# मतदान करा ! आकर्षक बक्षिसे जिंका

### बाईक, रेसींग सायकल आणि न्ड्राईड मोबाईल

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

देशाच्या प्रगतीसाठी, ध्येयधोरणे ठरविण्यासाठी मतदान करून आपला सहभाग लोकशाही प्रक्रियेमध्ये नोंदविणे अत्यंत महत्वाचे आहे. १३ – चंद्रपूर लोकसभा मतदार संघाची निवडणूक १९ एप्रिल २०२४ रोजी २११८ मतदान केंद्रावर होणार असून सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदानाची वेळ आहे. या निवडणुकीत जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करून लोकशाही प्रक्रियेमध्ये सहभागी व्हावे, या उद्देशाने जिल्हा प्रशासनाच्या वतीने 'तुमचे मत द्या आणि लकी ड्रॉ मध्ये आकर्षक बक्षिसे जिंका' ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. तर मतदारांनो, ही स्पर्धा तुमच्यासाठी आहे. बस्स.... १९ एप्रिल रोजी मतदान करून सेल्फी अपलोड करा आणि जिंका बाईक, रेसींग सायकल आणि न्ड्राईड फोन.

१९ एप्रिल रोजी मतदान केल्यानंतर मतदारांनी शाई लावलेले बोट दाखवत मतदान केंद्रासमोर सेल्फी क्लिक करावा व आपला फोटो अपलोड करून या स्पर्धेत सहभागी व्हावे. फोटो अपलोड करण्यासाठीची लिंक / क्यूआर कोड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या https://chanda.nic.in तसेच जिल्हा परिषदेच्या https://zpchandrapur.co.in/ वेबसाईटवर उपलब्ध आहे.







पहिल्या तीन क्रमांकाचे आकर्षक बक्षीसे : प्रथम बक्षीस १ लक्ष ६० हजार रुपये किंमतीची टीव्हीएस कंपनीची अपाची आरटीआर – १४०, ४ व्ही बाईक, (आरटीओ आणि विमा खर्च समाविष्ट). सद्यस्थितीत विसापूर येथील श्रध्देय श्री. अटलबिहारी वाजपेयी बोटॅनिकल गार्डनमध्ये ही बाइक प्रदर्शित करण्यात आली आहे. इतर बक्षीसांमध्ये ९१ मिराकी ई-सायकल ( किंमत ३५ हजार) आणि सॅमसंग न्ड्राईड फोन (किंमत २० हजार )

पात्रता : १) चंद्रपूर जिल्ह्यातील नोंदणीकृत मतदार असणे आवश्यक आहे. २) १९ एप्रिल २०२४ रोजी यशस्वीरित्या मतदान करणे आवश्यक आहे.

अटी व शर्ती : १) इच्छुकांनी मतदानाच्या दिवशी सेल्फी घ्यावा आणि तो दिलेल्या गुगल फॉर्मवर अपलोड करावा. येथे दिलेला क्यूआर कोड देखील त्यात प्रवेश करण्यासाठी स्कॅन केला जाऊ शकतो. २) सेल्फी हा स्पष्ट आणि फिल्टर न केलेला कलर फोटो असावा. ३) सेल्फीमध्ये स्पर्धेत सहभागी होणाऱ्या व्यक्तिचा चेहरा, त्याचे/तिचे बोट अमिट शाईने (मतदान केल्यानंतर चिन्हांकित) दाखवत मतदान केंद्रासमोर सेल्फी क्लिक करा. ४) सेल्फी २० एप्रिल ११.५९ पीएम पूर्वी अपलोड करणे आवश्यक आहे. अंतिम मुदतीनंतर प्रवेशिका स्वीकारल्या जाणार नाहीत. ५) २० एप्रिल रोजी एक संगणकावर आधारित अल्गोरिदमिक लकी ड्रॉ काढण्यात येईल, जेणेकरून विजेते आणि चार प्रतीक्षा यादीतील उमेदवार घोषित केले जातील. ६) निवडून आलेल्या विजेत्याला त्याचे फोटो ओळखपत्र, व्होटर स्लिप आणि पॅन कार्ड सादर करण्यासाठी २३ एप्रिल, संध्याकाळी ५ वाजेपर्यंत तीन दिवसांचा वेळ दिला जाईल. ७) असे करण्यात अयशस्वी झाल्यास प्रतीक्षा यादीतील पुढील उमेदवाराला संधी दिली जाईल.

हे सहभागी ठरू शकतात अपात्र : १) सेल्फीमध्ये चेहरा अस्पष्ट आहे किंवा बोटावर शाई आहे किंवा मतदान केंद्र दिसत नाही. २) आवश्यक कागदपत्रे तीन दिवसांत सादर करण्यात अयशस्वी. ३) गुगल फॉर्ममध्ये सर्व तपशील भरलेले नाहीत. ४) चंद्रपूर मतदारसंघात मतदार म्हणून नोंदणीकृत केलेली नाही. ५) कोणत्याही प्रकारच्या निवडणुकीत किंवा कायदेशीर गैरव्यवहारात भाग घेतल्याचे आढळण्यात आले.


तर मतदारांनो, या स्पर्धेत जास्तीत जास्त मतदारांनी सहभागी होऊन लोकशाही प्रक्रियेला बळकट करा आणि बक्षीसे जिंका, असे आवाहन जिल्हा निवडणूक आधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले आहे.

# आर्यभट्टः इस्त्रोचे अत्याधुनिक तंत्रज्ञान!

**पर्यावरण, हवामान, कृषी, भूकंप, त्सुनामी यांसारख्या क्षेत्रांचीही माहिती क्षणात मिळवून देणारे स्वदेशी तंत्रज्ञान आमच्या बहाद्दर शास्त्रज्ञांनी विकसित केले आहे. त्यात त्यांनी भरघोस यश मिळविले. प्रामुख्याने अमेरिका, चीन आणि रशिया या देशांकडे असलेल्या संरक्षण विषयक आणि टेहळणी करणारे उपग्रह असल्यामुळे भारतालाही अशा टेहळणी उपग्रहांची गरज भासू लागली. इ.स.१९७१च्या भारत-पाक युद्धात भारताने हे युद्ध जिंकले. भारताच्या लष्कराला टेहळणी उपग्रहाची जोड देण्याचा विचार तेव्हाच सुरू झाला होता. परंतु ज्या वेळी हा विचार पुढे आला, भारताला सहकार्य न करण्याची भूमिका त्या वेळी हे तंत्रज्ञान जवळ असलेल्या देशांनी घेतली. परिणामी भारताला स्वदेशी तंत्रज्ञान विकसित करणे भाग पडले. याचाच परीणाम म्हणजे दि.१९ एप्रिल १९७५ रोजी सोडलेला पहिला कृत्रीम उपग्रह आर्यभट्ट होय. श्री. एन. कृष्णकुमार, से.नि.अध्यापक यांच्या लेखात ही महत्वपूर्ण माहिती वाचा... संपादक.**

दि.१९ एप्रिल १९७५ रोजी भारतीय शास्त्रज्ञांद्वारे जो पहिला उपग्रह अंतरिक्षात झेपावला तो आर्यभट्ट होय. त्याची संरचना विक्रम साराभाई यांनी अहमदाबाद रिसर्च सेंटरमध्येच केली होती. आर्यभट्टाने यशस्वीपणे उड्डान केल्यानंतर त्यावेळच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी विक्रम साराभाईंचे अभिनंदन केले होते. आर्यभट्टाच्या यशस्वी प्रक्षेपणानंतर भारताने अनेक उपग्रह आकाशात झेपावले आणि ते यशस्वीपणे काम करत होते. या अंतरीक्ष संशोधनामध्ये साराभाई यांचे अथक परिश्रम, दूरदृष्टी कारणीभूत आहे. ही मोहीम यशस्वीपणे राबविण्यासाठी विक्रम साराभाईंसोबतच हजारो शास्त्रज्ञांनी अहोरात्र परिश्रम घेतले. नवनवीन तंत्रज्ञान विकसित केले. क्रायोजेनिक इंजिन मिळवण्यात येणार्या अडचणी लक्षात घेता भारतातच हे इंजिन तयार केले. नवनवीन इंधनांचा प्रयोग केला आणि आपली ही मोहीम पुढेच नेली. त्यामुळेच आज या दिवशी या मोहिमेत आपले योगदान देणारे सर्व जण अभिनंदनास पात्र आहेत.

दि.२७ नोव्हेंबर १९६३ रोजी थुंब्याहून नाईके ऍपची नावाचा अमेरिकन अग्निबाण सोडण्यात आला. ही इस्त्रोच्या आगमनाची नांदी होती. थुंबा हे केरळमधील सागरकिनारी वसलेले एक लहानसे खेडे आहे. तेव्हा थुंबा या गावाजवळ साधी सडकसुध्दा नव्हती. मात्र या संशोधन केंद्रात रशियामधून आलेले एक यंत्र घेऊन जाण्याची गरज होती. तेथे मोटार जात नव्हती, म्हणून हे रशियन यंत्र बैलगाडीतून तेथे नेण्यात आले होते. त्या बैलगाडीतून भारताचा अंतराळ संशोधन प्रवास सुरू झाला आणि आज भारत हा जगातला या क्षेत्रातला आघाडीचा देश ठरला आहे. अवकाश संशोधनावर गेल्या पन्नास वर्षात आपण केलेला खर्च केवळ बारा अब्ज डॉलर एवढा आहे. या उलट अमेरिकेचा या कार्यक्रमासाठीचा एका वर्षाचा अर्थसंकल्प सतरा



**संकलन व सुलेखन**
**श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली,**
**फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.**

अब्ज डॉलर एवढा आहे. याचा विचार केला तर या कार्यक्रमावर आपण केलेला खर्च किती कमी व तरीही किती उपयोगी आहे? हे लक्षात येऊ शकेल. अमेरिका, रशिया आणि जपान या पाठोपाठ खगोलीय उपग्रह अवकाशात पाठवणारा आपला भारत हा जगातला चौथा देश ठरला आहे. इस्त्रोची स्थापना दि.१५ ऑगस्ट १९६९ रोजी झाली. प्रारंभीच्या काळात इस्त्रोची उद्दिष्टे मर्यादित होती. परंतु पुढे इंदिरा गांधी यांच्या काळात अन्नधान्याच्या उत्पादनापासून ते अंतराळ संशोधन क्षेत्रात स्वयंपूर्णतेचे उद्दिष्ट निश्चित केले गेले. त्यातून अंतराळ संशोधनासाठी इस्त्रोची स्थापना केली गेली. त्यानंतर अवघ्या सहाच वर्षांत आर्यभट्ट या उपग्रहाची जुळणी देशातील शास्त्रज्ञांनी यशस्वी करून दाखवली. इस्त्रोच्या वाटचालीचा हा पहिला टप्पा होता. इन्सॅट उपग्रहांची मालिका कार्यरत करणे हा दुसरा आणि सन १९९०पासून ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपण यान- पीएसएलव्ही तसेच भूसंकलिक उपग्रह प्रक्षेपण यान- जीएसएलव्ही हे पूर्णत: भारतीय संशोधनातून बनले. यासाठी क्रायोजेनिक इंजिनही इस्त्रोने स्वत: बनवणे, हा तिसरा टप्पा होता. चांद्रयान ते मंगळयान या चौथ्या टप्प्यावर आता आपण आहोत. या सर्व टप्प्यांत कोणतीही वाच्यता न करता देशाच्या संरक्षणाची गरज भागेल, असे कामही इस्त्रो करीत आली आहे. मुख्य म्हणजे या सर्व वाटचालीत तिची स्वायत्तता कधीही धोक्यात आली नाही.

भारतात माहिती-तंत्रज्ञान क्रांतीची मशाल या मोहिमेनेच पेटविली. त्या काळात टीव्ही, इंटरनेट यांसारख्या सेवा नव्हत्या. त्यामुळे भारताला रेडिओवरच समाधान मानावे लागत होते. पण इस्त्रोने या सेवा भारताला प्रदान करण्यासाठी अंतराळात अनेक उपग्रह सोडले. त्यामुळेच आज संपूर्ण भारतीय या अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा लाभ घेत आहेत. केवळ माहिती आणि तंत्रज्ञानच नव्हे, तर पर्यावरण, हवामान, कृषी, भूकंप, त्सुनामी यांसारख्या क्षेत्रांचीही माहिती क्षणात मिळवून देणारे स्वदेशी तंत्रज्ञान आमच्या बहाद्दर शास्त्रज्ञांनी विकसित केले आहे. त्यात त्यांनी भरघोस यश मिळविले. प्रामुख्याने अमेरिका, चीन आणि रशिया या देशांकडे असलेल्या संरक्षणविषयक आणि टेहळणी करणारे उपग्रह असल्यामुळे भारतालाही अशा टेहळणी उपग्रहांची गरज भासू लागली. इ.स.१९७१च्या भारत-पाक युद्धात भारताने हे युद्ध जिंकले. भारताच्या लष्कराला टेहळणी उपग्रहाची जोड देण्याचा विचार तेव्हाच सुरू झाला होता. परंतु ज्या वेळी हा विचार पुढे आला, भारताला सहकार्य न करण्याची भूमिका त्या वेळी हे तंत्रज्ञान जवळ असलेल्या देशांनी घेतली. परिणामी भारताला स्वदेशी तंत्रज्ञान विकसित करणे भाग पडले. याचाच परीणाम म्हणजे दि.१९ एप्रिल १९७५ रोजी सोडलेला पहिला कृत्रिम उपग्रह आर्यभट्ट होय.

आर्यभट्ट हा भारताचा ३६० किग्रॅ वजनाचा पहिला उपग्रह कापुस्टीन यार या रशियन अंतराळ स्थानकावरुन प्रक्षेपित करण्यात आला. ही इस्त्रोची पहिली मोहीम होती. थोर भारतीय गणितज्ञ व खगोल शास्त्रज्ञ आर्यभट्टांचे नाव या उपग्रहाला देण्यात आले. तो फक्त पाच दिवसच कार्यरत होता; कारण त्याचे आयुष्यच मुळी काही दिवसांचे होते. सुमारे पाच दिवस पृथ्वीभोवती प्रदक्षिणा घातल्यानंतर उपग्रहाचा इस्त्रोशी संपर्क तुटला. स्वतःचा पहिला उपग्रह रशियाच्या मदतीने पाठवणाऱ्या आपल्या भारताने आतापर्यंत वीस देशांचे ५१ उपग्रह प्रक्षेपित करून ५०० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवले आहे. ॲस्ट्रोसेटच्या यशस्वी प्रक्षेपणाने जागतिक अवकाश संशोधनाच्या क्षेत्रातही नवा इतिहास रचला गेला आहे. पोलर सॅटेलाईट लाँच व्हेईकल- पीएसएलव्ही या प्रक्षेपकाद्वारे इ.स.२०१०मध्ये एकाच वेळी दहा उपग्रह अवकाशात यशस्वीपणे प्रक्षेपित करायचा नवा विक्रम तथा इतिहासही इस्त्रोनेच लिहिला. इंग्लंड, अमेरिका, रशिया, फ्रान्स या देशांची अवकाश संशोधनाच्या क्षेत्राची मक्तेदारी भारताने मोडून तर काढलीच, पण या क्षेत्रात दबदबाही निर्माण केला. ज्या अमेरिकेने हे तंत्रज्ञान आपल्याला देण्यास नकार दिला, त्याच अमेरिका व ब्रिटनसह काही देशांचे एकूण अकरा उपग्रह भारताने अवकाशात सोडले होते. यालाच म्हणतात काळाचा महिमा! अडचणीशिवाय सन्मानर्ग गवसत नाही, हेच शेवटी खरे ठरले.

!! प्रथम आर्यभट्ट प्रक्षेपण दिनाच्या सप्ताहभर सर्व भारतीयांना हार्दिक शुभेच्छा !!

## डॉ.आर.एस.जेथलिया यांनी हीच सेवा भावी वृती कायम ठेवावी-वसंत मुंडे

**माजलगाव । प्रतिनिधी**

जेथलिया हाँस्पिटल ला भेट देऊन डाँ ऋषिकेश जेथलिया यांना शुभेच्छा देताना, तसेच सेवाभावी वृत्तीने वैद्यकीय व्यवसाय करत आहेत त्या बदल वसंत मुंडे,वैभव स्वामी यांनी डाँ ऋषिकेश जेथलिया यांचे अभिनंदन केले.

पत्रकारांना आयुष्यभर मोफत तपासणी, सैनिक व सैनिकांनाच्या आई वडिलांना मोफत तपासणी, सोमवारी दुपारी पर्यंत मोफत तपासणी, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत म्हातारी माणसं यांना मोफत तपासणी या गोष्ट डाँ ऋषिकेश जेथलिया यांच्या कडुन समजून घेऊन आनंद व्यक्त केला.

याच सामाजिक जाणीव जपून वैद्यकीय व्यवसाय करा असे मार्गदर्शन वसंत मुंडे यांनी केले



महाराष्ट्र मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतरावजी मुंडे, मराठवाडा अध्यक्ष वैभवजी स्वामी,डाँ ऋषिकेश जेथलिया बाबा देशमाने, संतोषबापु जेथलिया, पत्रकार परमेश्वर सोंळके , सुदर्शन स्वामी,रविकांत उगडे,भदरगे मामा,अमर साळवे इत्यादी सर्व उपस्थित होते. याच वेळी अपघाता मध्ये निधन झालेले पत्रकार सचिन नाईक यांच्या घरी भेट देऊन.त्यांना महाराष्ट्र मराठी पत्रकार संघाच्या वतीने मदत दिली.

## गहिनीनाथगड व नारायण गडाच्या धर्तीवर रामगडाचा विकास करणार-पंकजाताई मुंडे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याला अध्यात्मिक क्षेत्रात गडांचे वैभव लाभले. गहिनीनाथगड, नारायणगडाच्या विकासासाठी विविध योजनेतून निधी दिला. मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत नारायण गडाला जोडणाऱ्या रस्त्यांना प्राधान्य देऊन, भाविक भक्तांना दळणवळणाची सुविधा उपलब्ध करून दिली. आज प्रथमच राम जन्मोत्सवाच्या निमित्ताने रामगडावर येण्याचे भाग्य मला मिळाले. यानिमित्ताने पंचक्रोशीतील हजारो राम भक्तांची भेट झाली. गडाचे महंत स्वामी योगीराज महाराज यांनी गडाच्या विकास कामाला चालना दिली. येथे विकास कामांची गरज आहे. गडाचे महंत आणि विश्वस्तांनी प्रस्तावित केलेला तीर्थक्षेत्र योजने अंतर्गत पंधरा कोटींचा आराखडा मंजूर करण्यासाठी प्रयत्नशील राहील.



गहिनीनाथगड व नारायणगडाच्या धर्तीवर रामगडाचाही सर्वांगीण विकास करण्याची जबाबदारी स्वीकारून निश्चितपणे विकास करू असा विश्वास पंकजाताई मुंडे यांनी रामगड येथे रामनवमी उत्सवानिमित्त उपस्थित राम भक्तांशी संवाद साधताना व्यक्त केला.

लाखो रामभक्तांचे श्रध्देय स्थान श्रीक्षेत्र रामगड येथे महंत स्वामी योगीराज महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली भगवान श्री प्रभु रामचंद्र यांच्या जन्मोत्सव निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह सांगता समारंभ प्रसंगी भाजपा महायुतीचे उमेदवार मा.पंकजाताई मुंडे यांनी अध्यात्मिक सोहळ्यात सहभागी होवून भाविक भक्तांना संबोधित केले. याप्रसंगी भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, शिवसेनेचे कुंडलिक खांडे, दिलीपराव गोरे, गणेश पुजारी, विश्वस्त रामा बांड, सखाराम मोहीते, शिवाजी निकम आदि उपस्थित होते. पंचक्रोशीतील भाविक भक्त गण हजारोंच्या संखेने उपस्थित होते. तर महिलांची गर्दी लक्षणीय होती.

### पंकजाताई मुंडेंसाठी बीडमध्ये प्रज्ञावंत सरसावले

# माझ्या विकास कामांचे रेकॉर्ड समोर ठेवून मला भरघोस मतांनी संसदेत पाठवा

### प्रज्ञावंतांच्या मेळाव्यात महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांचे आवाहन








**बीड । प्रतिनिधी**

मी राजकारणात कधीही कुठला भेदभाव केला नाही. तुम्हीही मतदार म्हणून करणार नाहीत याची खात्री आहे.उमेदवार म्हणून आपणास पसंत आहे, त्यामुळे देशाच्या सर्वोच्च सभागृहात काम करण्याची संधी मला द्या. संसदेत जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करताना बीड जिल्ह्यात येणाऱ्या पाच वर्षात उद्योग व्यवयाय आणून १० हजार रोजगार उपलब्ध करेल. तसेच बीडमध्ये मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल आणेल. याबरोबरच जिल्ह्यात मोठे मेडिकल कॉलेजला मंजुरी आणतांनाच जिल्हा दुष्काळ मुक्त करण्यासाठी काम करणार आहे. त्यामुळे मतदार म्हणून विकासाच्या कामांना आपले भरीव योगदान देण्यासाठी तुमचे मतरुपी सत्पात्री दान माझ्या पदरात टाका असे आवाहन भाजप महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केले. माझ्या मंत्रिपदाच्या काळातील विकास कामांचे रेकॉर्ड समोर ठेवून तुम्ही मला भरघोस मतांनी निवडून द्या असेही त्या म्हणाल्या.

भाजप महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ आज सूर्या लॉन्स येथे प्रज्ञावंतांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. व्यासपीठावर उमेदवार आ. सतीश चव्हाण, माजी आमदार अमरसिंह पंडित, राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष योगेश क्षीरसागर, दिपक घुमरे, भाऊसाहेब नाटकर, मुजीब पठाण आदी उपस्थित होते. यावेळी पंकजाताई मुंडे म्हणाल्या, आपण समाजाचे खरे मार्गदर्शक आहात. सर्वजण सुशिक्षित आहेत. उमेदवार म्हणून माझ्या पक्षाने माझी जी निवड केली आहे, ती सार्थ करण्यासाठी मला प्रचंड मताधिक्य देऊन निवडून द्या. माझ्यासाठी आपले योगदान खूप महत्त्वाचे आहे, ते तुम्ही द्या. आपला उमेदवार म्हणून मी संसदेत बीड जिल्ह्याच्या विकासाचे भरीव काम करून दाखवेल. मी कायम तुमच्यासोबत असेन, तुमचे सर्व प्रश्न सोडवण्यासाठी मी कटिबद्ध राहील असे सांगत पंकजाताई मुंडे यांनी उमेदवार का आणि कसा निवडावा यावर उपस्थितांशी संवाद साधला.मी मंत्री असताना कसे काम केले आहे. विकासाचे किती प्रश्नमार्गी लावले हे सर्वांना माहिती आहे, कारण मी राज्य मंत्रिमंडळात मंत्री असताना केलेले काम दिसणारे आहे तरीही माझा सर्वांशी असलेला व्यवहार आणि उमेदवार म्हणून किती व्यापकतेने प्रश्न सोडवून विकासकामे करू शकते हे समोर ठेऊन तुम्ही मला मतदान करावे असे आवाहनही यावेळी पंकजाताई मुंडे यांनी केले.पुढे त्या म्हणाल्या, उमेदवाराला निवडून आल्यानंतर त्याच्यासह मतदार संघातील मतदारांचे पण चांगले भविष्य असावे लागते. मतदारांचे हे चांगले भवितव्य आणण्यासाठी मला उमेदवार म्हणून तुम्ही मतदान करावे. जिल्हा परिषद शाळांच्या वर्ग खोल्यांची दुरुस्ती असो की जिल्ह्यातील ग्रामपंचायती पंचायत समित्यांचे नवीन इमारत बांधकामाचे कामे असो हे सर्व मागच्या काळात आपण मार्गी लावली आहेत. या सर्व योजना आणि निर्णय घेताना कोणताही भेदभाव केला नाही.आरक्षणाचा मुद्द्यावर निवडणूक नेऊ नका असं त्या म्हणाल्या.मी सत्तेत असताना कोणत्याही घटकावर अन्याय होणार नाही असे काम केले आहे. शिक्षक आणि शिक्षण क्षेत्रातील समस्या सोडवण्यासाठी काम केलेले आहे.यापूर्वी ग्रामविकास मंत्री असताना राज्यात ऑनलाइन शिक्षक बदलीचा घेतलेला निर्णय महत्त्वाचा ठरला.यामुळे राज्यातील हजारो शिक्षकांना फायदा झाला. माझी भूमिका कायम विकासासोबत आहे. त्यामुळे तुमचे मत मी वाया जाऊ देणार नाही अशी ग्वाही या प्रसंगी पंकजाताई मुंडे यांनी दिली.राज्य शासनाच्या योजना केंद्र सरकारच्या सहकार्याने राबवण्यासाठी पंकजाताई मुंडे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्या असे आवाहन आ.प्रकाश सोळंके, आ. सतीश चव्हाण यांनी यावेळी केले.पंकजाताई मुंडे यांचेकडे तत्परतेने विकास कामे करण्याची हातोटी आहे असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. जागृत मतदार म्हणून ही निवडणूक आपण सर्वांनी आपण स्वतः उमेदवार असल्याचे समजून पंकजाताई मुंडे यांना मतदान करावे.पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या रूपाने कणखर नेता देशाला पुन्हा हवा आहे त्यासाठी बीडमध्ये पंकजा मुंडे यांना निवडून देणे गरजेचे आहे. आज मोदींनी जगात भारताचा दबदबा निर्माण केला आहे असे ते म्हणाले. माजी आमदार अमरसिंह पंडित, युवा नेते योगेश क्षीरसागर आदींची समयोचित भाषणे झाली. दरम्यान बुधवारी दुपारपासून बीड शहर व परिसरात अवकाळी पाऊस सुरू होता त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले मात्र पंकजाताईंच्या या मेळाव्याला प्रज्ञावंतांनी प्रचंड संख्येने उपस्थिती दर्शवत हा मेळावा यशस्वी केला.

# केंद्र सरकारने वृत्तपत्र खरेदी करणाऱ्यांना उत्पन्न करात वार्षिक पाच हजार रुपये सूट द्यावी

## प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या मागणीला पाठिंबा – खा.ओमराजे निंबाळकर

**धाराशिव । प्रतिनिधी**

कोरोना काळानंतर महाराष्ट्रासह सबंध देशात वृत्तपत्र व्यवसायावर मोठा परिणाम झाला असून खप आणि जाहिरातींचे प्रमाणही कमी झाले आहे. यासाठी केंद्र सरकारने वृत्तपत्र खरेदी करणाऱ्या आयकरदात्यांना उत्पन्न करात वार्षिक पाच हजार रुपयांची सूट द्यावी ही पत्रकार संघाच्या मागणी रास्त असून आपाला पाठिंबा आहे. अशी ग्वाही धाराशिव लोकसभेचे विद्यमान खासदार आणि महाविकास आघाडीचे विद्यमान उमेदवार ओमराजे निंबाळकर यांनी दिली.प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केंद्र सरकारकडे केलेली मागणी वृत्तपत्रांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करणारी आहे.त्यामुळे पुन्हा लोकसभेत गेल्यावर यासाठी पाठपुरावा करू असेही सांगितले.

धाराशिव येथे मंगळवार दिनांक १७ एप्रिल २०२४ रोजी महाविकास आघाडीचे उमेदवार तथा धाराशिव चे विद्यमान खासदार माननीय श्री ओमराजे निंबाळकर यांची पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर निवेदन दिले. यावेळी पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, राज्य कार्यकारणी सदस्य बाबासाहेब देशमाने यांच्यासह धाराशिव चे जिल्हाध्यक्ष धनंजय पाटील पत्रकार संघाचे धाराशिव येथील पदाधिकारी पत्रकार श्रीराम क्षीरसागर, रामेश्वर डोंगरे, सय्यद कलीम मुसा यासह पत्रकार बांधव उपस्थित होते यावेळी मागणी विषयी माहिती देताना प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे म्हणाले की, केंद्र सरकार खाजगी विमा कंपन्यांचा व्यवसाय वाढावा आणि लोकांनी विमा घ्यावा यासाठी विमा घेणाऱ्या ग्राहकाला वार्षिक उत्पन्न करात एका विमा हप्त्या इतक्या रक्कमेची सूट दिली जाते. तसेच अनेक छोट्या-मोठ्या उद्योगांना सरकार वेगवेगळ्या स्वरूपाची प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष आर्थिक मदत देते. याच धर्तीवर वृत्तपत्र खरेदी करणाऱ्या आयकर दात्यांना वार्षिक पाच हजार रुपयांची सूट दिली तर देशातील ३५ हजार कोटींच्या व्यवसायाला,उर्जित अवस्था प्राप्त होईल. यातून मागणी वाढल्याने मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल. तसेच या व्यवसायातील लोकांना आर्थिक स्थिरता येईल. आणि वाचन संस्कृतीचीही जोपासना होईल. महाराष्ट्रात सध्या शासनाच्या यादीवर असलेले दीड हजार वृत्तपत्र व साप्ताहिके आहेत. या व्यवसायावर अवलंबून असणारे हजारो लोक आहेत. यासाठी आपण पुढाकार घ्यावा आणि केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा अशी विनंती केली.देशातील मीडियाच्या आर्थिक हितासाठी ही मागणी रास्त असल्यामुळे मी या पाठिंबा देत आहे. मी लोकसभेच्या सभागृहात गेल्यावर हा विषय मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करेल अशी ग्वाही ओमराजे निंबाळकर यांनी दिली.



# ग्रामिण रोजगार हमी योजनेतील विहिरीचे खोदकामे जेसीबी यंत्राच्या साह्याने होत असल्याने रोजगारावर उपासमारीची वेळ

## चौकशी करून कारवाई करा ! अन्यथा २ मे रोजी आत्मदहनाचा ईशारा


**मानवत । प्रतिनिधी**

मानवत तालूक्यातील मौजे मानोली येथे मानोली ग्राम पंचायतीचे सरपंच व रोजगार सेवक यांच्या संगणमताने विहिरीचे यंत्राच्या साह्याने खोदकामे करण्यात येत असून त्यामूळे कामगारावर उपारमारीचे संकट ओढावले असल्याची तक्रार गावातील नागरीकांनी मानवत पंचायत समितीच गटविकास अधिकारी यांच्याकडे एका निवेदना द्वारे करण्यात आली.



सविस्तर वृत्त असे की,राज्यशासनाने मागेल त्याला विहिर दिली असून त्यामूळे ग्रामिण रोजणदारी कामगारांना काम मिळून त्यांचा रोजगाराचा प्रश्न मिटेल असे असतांनाही मानोली येथे ग्राम रोजगार सेवक व सरपंच यांच्या मनमानी व संगणमताने मजूरा ऐवजी यंत्राने विहिरीचे खोदकामे करण्यात येत असल्याची तक्रार गटविकास अधिकारी यांच्याकडे नागरीकांनी केल्याने खळबळ ऊडाली.

म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत विहिर खोदकामास मजुरांच्या सहाय्याने न करता जेसीबीने करत असले मूळे मजूरावर उपासमारीची वेळ आली असल्याची तक्रार संतोष सदाशिव शिंदे, सुरेश बालासाहेब मांडे मानोली येथील रहिवाशी असून मौजे मानोली येथील ग्रामरोजगार सेवक व सरपच व काही एजंट हे एकमेकांशी संगणमत करुन मजुरांच्या सहाव्याने विहिरीचे खोदकाम न करता शेतक-यांकडून अतिरीक्त पैसे घेवून जेसीबीच्या सहाय्याने खोदकाम करीत आहे. त्यामुळे मजुरांच्या हाताला काम मिळत नसल्यामुळे, मजुरांवर उपासमारीची वेळ येत आहे. तसेच काही वयोवृध्द मजुरांची देखील नावे लेबरकार्ड मध्ये टाकण्यात आलेलीआहेत. येथील ग्रामरोजगार सेवक, सरपंच व काही एजंट यांची चौकशी करुन योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी व मजुरांना रोजगार मिळवून देण्यात यावा ही नम्र विनंती. अन्यथा आपल्या कार्यालया समोर दिनांक ०२/०५/२०२४ रोजी आत्मदहन आंदोलन करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी व होणा-या सर्व परिणामाची संपुर्ण जबाबदारी आपल्या लोक कल्याणकारी पंचायत समिती प्रशासनावर राहिल. असा ईशारा दिलेल्या निवेदनाद्वारे संतोष सदाशिव शिंदे, सुरेश बाळासाहेब मांडे यांनी प्रशासनाला दिला आहे.



महाराष्ट्र राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे भीम जयंती निमित्त अभिवादन करताना सोबत रत्नाकर गुट्टे,मेघना बोर्डीकर,राजेश विटेकर,प्रताप देशमुख,अक्षय जगताप

# मतं आमची आणि मक्तेदारी प्रस्थपित नेत्यांची आता शक्य नाही–सुरजदादा बनसोडे

**सांगोला । प्रतिनिधी**

माढा लोकसभा मतदार संघात चाललेलं राजकीय नाट्य अजून म्हणावं तस स्पष्ट मिटलेलं दिसत नाही आत्ता पर्यंत इच्छुक उमेदवार सांगोला तालुक्यात दौऱ्यासाठी आले की पाटील किव्हा देशमुख यांना बरोबर घेऊन प्रस्थापित नेते किव्हा पुढारी यांच्याच गाठी भेटी घेत आहेत मराठा किंवा धनगर समाजाची नेतेमंडळी व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या घरी भेटी घेत आहेत वास्तविक पाहता सांगोला तालुक्यात माढा मतदार संघात इतर समाजाची मते आहेत का नाहीत उदा :- दलित , मुस्लिम , भटके विमुक्त , अल्पसंख्यांक या समाजाचे नेते पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या गाटी भेटी घेऊन चर्चा करताना दिसत नाहीत , ह्याचा अर्थ या प्रस्थपित नेत्यांनी या समाजाला गृहीत धरून ह्यांची मालकी व मक्तेदारी घेतली आहे असे चित्र तालुक्यात तयार करून राजकीय पक्षांना



व उमेदवारांना भासवून दिले आहे सांगोला तालुक्यात आम्ही रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून गेली २५ वर्ष सर्वसामान्य गोरगरीब सर्वसामाजातील जनतेची कामे निस्वार्थी पणे अविरत केली आहेत त्या अनुषंगाने सर्व जाती धर्माच्या लोकांशी नाळ जोडली गेली आहे आता पर्यंत लोकांच्या अडी अडचणी , अत्याचार न्याय हक्कासाठी महाराष्ट्र व देशभर घडलेल्या वाईट गोष्टीवर सर्वात जास्त मोर्चे काढून निवेदन देऊन आंदोलने केली आहेत सांगोला तालुक्यातील प्रत्येक निवडणुकीत योग्य भूमिका घेऊन दखलपात्र भूमिका केली आहे , लोकसभा ही निवडणूक विधानसभे पेक्षा खूप महत्त्वाची व गांभीर्याने घेण्याची आहे कारण लोकसभेमध्ये देशातील जनतेच्या हिताचे निर्णय होत असतात म्हणून लोकसभेत योग्य उमेदवार व कोणत्या पक्षाचा असावा हे महत्वाचे असते परंतु मतदार संघातील पाटील देशमुख आपल्या राजकीय व आर्थिक फायद्यासाठी कोणत्याही उमेदवाराकडून उचली घेऊन इतर समाजाची मक्तेदारी घेतल्याच्या अविर्भावात आहेत अशा नेत्यांची दुकानदारी ह्या निवडणुकीत चालू देणार नाही असे मत रिपब्लिकन पँथर ऑफ इंडिया चे संस्थापक अध्यक्ष व नगरसेवक सुरजदादा बनसोडे यांनी व्यक्त केले माढा लोकसभा निवडणुकीत तालुक्यातील सर्वच प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्याशी चर्चा करून भूमिका लवकरच स्पष्ट होईल

# साकडे सुलतान उर्स कमिटीच्या अध्यक्षपदी कय्युम मुजावर यांची निवड

**सांगोला । प्रतिनिधी**

सांगोला शहरातील मुजावर गल्ली येथील सय्यद साकडे सुलतान दर्गाह चे सालाबाद प्रमाणे उर्स चे नियोजन करण्यासाठी मुजावर बिरादरीची दर्गा मशीद येथे बैठक संपन्न झाली या बैठकीमध्ये उपस्थित बांधवांनी समाजातील अडीअडचणी सह आगामी काळातील सामाजिक भूमिका यासह विषयांवर विविध विषयांवर चर्चा करत खेळीमेळीच्या वातावरणात ही बैठक संपन्न झाली. या बैठकी प्रसंगी आगामी सन २०२४- २५ या कालावधीमध्ये होऊ घातलेल्या उर्स साठी कार्यकारणी निवडण्यात आली सर्वानुमते कय्युम मुजावर सर यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली तर नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे शब्बीर मुजावर यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली या निवडीनंतर उपस्थित असणाऱ्या मान्यवरांच्या हस्ते नूतन अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांचे सत्कार करून त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या या सत्काराप्रसंगी बोलताना नूतन अध्यक्ष कय्युम मुजावर यांनी सांगितले की माझ्यावर मुजावर बिरादरीने जो विश्वास दाखवून या पदाची जबाबदारी सोपवली ती जबाबदारी मी यशस्वीरित्या पार पाडेन तसेच या कमिटीचा अध्यक्ष म्हणून आगामी काळात पारदर्शक कारभार केला जाईल अशी ग्वाही ही यावेळी त्यांनी दिली.या बैठकी प्रसंगी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते ईलाही मुजावर,अंबिर मुजावर, रउफ मुजावर, जमीर मुजावर, खलील मुजावर, जाकीर मुजावर, शकील मुजावर यांच्यासह मुजावर बिरादरीतील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होतेयावर्षीचा सय्यद साकडे सुलतान दर्गाह चा संदल (गंध) २५ तारखेला सायंकाळी पार पडणार आहे सायं. ७ वाजता संदल (गंध) चा कार्यक्रम पार पडल्यानंतर भाविक भक्तांना प्रसाद अर्थात लंगरचे वाटप करण्यात येईल तर २६ तारखेला उर्स साजरा करण्यात येणार असून सर्व भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असेह आवाहन नूतन अध्यक्ष यांनी यावेळी केले.

## मतदार राजा जागा हो!

# लोकशाहीचा धागा हो, अशा जय घोषाणी मतदार जागृती अभियान संपन्न




**मानवत । प्रतिनिधी**

मानवत नगरपरिषद मानवत जागरूक मतदार म्हणजे लोकशाहीचा अंगरक्षक या अभियाना अंतर्गत माझे मत माझा अधिकार लोक जनजागृती निमित्त पाथरी तालुका शिक्षण प्रसारक मंडळा च्या अंतर्गत श्रीमती शकुंतलाबाई कांचनराव कत्रुवार विद्यालय, आणि

सौ. रामकंवर द्वारकादास लड्डा विद्यालय मानवत यांच्या संयूक्त विद्यमाने मानवत शहरात शेकडो शालेय मूला मूलींनी सहभाग घेऊन मतदान, मतदार लोक जनजागृती करण्यात आली त्यावेळी, विद्यालयाचे मुख्याध्यापक पी. एम. कजेवाड , मुख्याध्यापक व्ही.ओ इंगोले, विद्यालयाचे पर्यवेक्षक एम.डी केकान ,जी.बी जोशी श्री दासरवाड सर श्री लोखंडे सर गोपाळ कदम, यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व शेकडो शालेय विद्यार्थी यांचा उत्स्फूर्त सहभाग या मतदार जन जागर रॅली मध्ये यावेळी होता.

## महाराणी ताराबाई विद्यालयामध्ये मतदार जनजागृती कार्यक्रम व रॅली संपन्न

# शालेय विद्यार्थी प्रभावीपणे मतदारांमध्ये मतदान जनजागृती करू शकतात–प्राचार्य राऊत डी. डी.

**वडवणी । प्रतिनिधी**

जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी बीड यांच्या आदेशानुसार वडवणी शहरातील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये दि.१ एप्रिल २०२४ सोमवार रोजी मतदार जनजागृती रॅली व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य राऊत डी. डी.तर प्रमुख मान्यवर म्हणून उपप्राचार्य ए.आर.मस्के ,पर्यवेक्षक धाईतिडक पी.एम.,श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम उपस्थित होत्या.

श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम आपले विचार व्यक्त करताना त्या म्हणाल्या की,लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये आपल्या पालकांनी सक्रिय सहभाग घेऊन निपक्षपणे मतदान करावे

जे विद्यार्थी प्रथमच मतदान करणार आहेत त्यांनी जबाबदारीने मतदान करून बीड जिल्ह्याचा खासदार लोकसभेत प्रतिनिधी म्हणून पाठवावा तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य राऊत सर यांनी विद्यार्थ्यांची संवाद साधताना म्हणाले की, निवडणुका म्हणजे लोकशाहीचा उत्सव आहे आणि या उत्सवामध्ये सर्व मतदारांनी मतदान केंद्रावर जाऊन आपला मतदानाचा हक्क बजावायला हवा वडवणी येथील गटशिक्षण अधिकारी मा.बाबासाहेब उजगरे साहेब यांना असे वाटते की, मुख्याध्यापक,शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या माध्यमातून मतदारांमध्ये प्रभावीरीत्या मतदान जनजागृती होऊ शकते म्हणून वडवणी तालुक्यातील प्रत्येक शाळेमध्ये, महाविद्यालयामध्ये मतदार जनजागृतीचे कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे आपल्या घरातील प्रत्येक मतदाराला मतदान केंद्रापर्यंत नेण्याचं काम तुम्ही करावे असे त्यांनी विद्यार्थ्यांना आवहान केले. विद्यार्थी,शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मतदार शपथ देऊन कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे उपप्राचार्य मस्के सर यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अंडील जी.पी.यांनी केले , कार्यक्रमाचे आभार पर्यवेक्षक श्री धाईतिडक सर यांनी मानले. यानंतर मतदार जनजागृती रॅलीला प्रारंभ झाला मतदार जनजागृती चे घोषवाक्यांचे फलक हातात घेऊन घोषणा देऊन विद्यार्थ्यांनी मतदार जनजागृती रॅलीतून मतदारांमध्ये जनजागृती केली. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## श्रीराम नामाच्या जयघोषाने दुमदुमले अवघे चंद्रपूर!

# आकर्षक रोषणाई व आतषबाजीने वेधले चंद्रपूरकरांचे लक्ष;अभूतपूर्व उत्साहाने वातावरण भक्तीमय

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आकर्षक रोषणाई लक्षवेधक आतषबाजी श्रीराम नामाचा जयघोष अभूतपूर्व उत्साह आणि पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेले चिमुकले यामुळे अवघे चंद्रपूर श्रीरामनवमीच्या भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघाले. 'जय श्रीराम' च्या घोषणांनी अवघे चंद्रपूर दुमदुमले. शहरातील मुख्य रस्ते गर्दीने फुलून गेले होते. पोलिसांच्या चोख बंदोबस्तात निघालेली शोभायात्रा चंद्रपूरकरांसाठी खऱ्या अर्थाने भक्तीमय मेजवानी ठरली. चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदार संघातील भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई (आठवले गट), पिरीपा (कवाडे गट), रासप मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार सुधीर मुनगंटीवार, राष्ट्रीय मागासवर्गिय आयोगाचे अध्यक्ष तथा भाजपा ज्येष्ठ नेते हंसराज अहिर आणि चंद्रपूर विधानसभेचे आमदार किशोर जोरगेवार यांच्यासह अनेक दिग्गज नेते शोभायात्रेत सहभागी झाले होते.

चंद्रपूर शहरात श्री राम नवमीच्या शोभायात्रेची अनेक वर्षांची परंपरा आहे. रामनवमीनिमित्ताने श्रीराम नवमी समिती, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल तसेच विविध संघटनाद्वारे रामनवमी उत्साह व जल्लोषात साजरी करण्यात आली. शोभायात्रेत बालवृद्धांचा सहभाग, चिमुकल्यांनी धारण केलेली श्रीराम, सीता, लक्ष्मणाची वेशभूषा व चौकाचौकात घुमणारा प्रभू श्रीरामचंद्राचा जयघोष व फटाक्यांची आतषबाजी यामुळे चंद्रपूर शहर दणाणून गेले होते. आज देशात श्रीराम नवमीचा उत्साह आहे. सर्वत्र उत्साहात राम नवमी साजरी होत आहे. यंदाची राम नवमी देशासाठी खास आहे. कारण अयोध्येत प्रभू रामचंद्रांच भव्य मंदिर उभ राहिल्यानंतर ही पहिलीच राम नवमी आहे. शेकडो वर्षानंतर देशवासियांच राम मंदिराच स्वप्न साकार झालं. आजच्या या पवित्र दिनाच्या पार्श्वभूमीवर चंद्रपूर ऐतिहासिक शहरात श्रीराम काळा मंदिर येथून मिरवणूक सुरु झाल्यानंतर लक्षवेधक आतषबाजी करण्यात आली. रामनवमी उत्सवानिमित्त रस्त्यांच्या भागात करण्यात आलेल्या केशरी विद्युत रोषणाईच्या पार्श्वभूमीवर होणारी आतषबाजी अतिशय नयनरम्य होती. सायंकाळी निघालेल्या मिरवणुकीच्या वेळी सर्वत्र जय श्रीराम घोषांनी आसमंत दुमदुमला होता. रामनवमीचा उत्साह चंद्रपूर शहरातील प्रत्येक भागात अनुभवास येत होता. 'भारत का बच्चा बच्चा जय जय श्रीराम बोलेगा', राम जी कि निकाली सवारी, आज राम आयेंगे, आदी भक्तिगीतांच्या तालावर तरुणाई बेधुंद नाचत होती. अनेक भागांमध्ये आकर्षक देखावे करण्यात आली होती. भव्य मिरवणूक, त्यामुळे चैतन्यमय



वातावरण झाले होते. रस्त्यांवर ओसांडलेला जनसमुदायश्रीराम काळा मंदिर संस्थान आणि चिमुकले राम मंदिरात रामनामाच्या आराधनेत भारावलेले भाविकपरिसरातील रस्त्यांवर रामनवमी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

'सियावर रामचंद्र की जय...' 'प्रभू श्री राम की जय', 'श्रीराम चंद्रांचा जयजयकार' अशा जयघोषांनी चंद्रपूर दुमदुमले. राम, लक्ष्मण आणि सीतेची झांकी, पालखी ग्रुपचे ढोल पथक लक्ष वेधून घेत होते. महायुतीचे अधिकृत उमेदवार सुधीर मुनगंटीवार, राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर आणि आ. किशोर जोरगेवार, सौ. सपना सुधीर मुनगंटीवार, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, महानगराचे जिल्हाध्यक्ष राहुल पावडे, राजीव कक्कड,डॉ.मंगेश गुलवाडे, रुद्रनारायण तिवारी,सैयद साजिद, सचिन कोतपल्लीवार, सुरज पेदुलवार, रणजित डवरे, सुशांत शर्मा, राजेश यादव यांच्यासह अनेक सामाजिक संघटना, विविध राजकीय पक्ष, भाजप महायुतीचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी शोभायात्रेत सहभाग घेतला. ठिकठिकाणी ना. सुधीर मुनगंटीवार यांचे सपत्नीक स्वागत करण्यात आले. अनेकांना त्यांच्यासोबत सेल्फी घेण्याचा मोह आवरता आला नाही. भगवान श्रीरामांना आपण मर्यादापुरुषोत्तम मानतो आणि यातच त्यांचे श्रेष्ठत्व व्यक्त होते. ज्यांनी नीतिमत्ता, धर्म, शास्त्र, व्यवहार यात स्वतः आखून घेतलेली चौकट कधीच ओलांडली नाही असे भगवान श्रीराम. भारतासारख्या खंडप्राय देशांत ऐक्य घडवणं हे तसे कठीण पण पिढ्यानपिढ्या ज्याला जसा श्रीराम भावला, तसा त्याने तो व्यक्त केला आणि त्यामुळे हा मर्यादापुरुषोत्तम देशाला बांधून ठेवणारी एक शक्ती ठरली. ह्या शक्तीला किंवा तिच्या अस्तित्वालाच नाकारण्याचे काम स्वतंत्र भारतात काही पक्षांकडून घडलं, ते का घडलं असेल देव जाणोधर्म, राजकारण, ईश्वर ह्यांची गल्लत हिंदूधर्मीयांकडून कधीच झाली नाही, आणि होणार देखील नाही. ह्याचं कारण श्रीराम असोत भगवान श्रीकृष्ण की शंकर हे माणसाच्या मनातील आदर्शांची, स्वप्नांची आणि त्यागाची प्रतीकं आहेत असे प्रतिपादन सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी केले.

## हिरवाईने नटलेल्या हिवरे बाजारचे नाव हिरवे बाजार करावेसे वाटते : समाधान महाराज शर्मा

**अहमदनगर । प्रतिनिधी**

माणसाने आपल्याला जाताना जी सहा मन वजनाची लाकडे लागतात इतकी तरी झाडे लावावीत. तोंड देखले वृक्षारोपण न करता संगोपन देखील महत्त्वाचे आहे. त्यामुळेच आदर्श गाव हिवरे बाजार हे चहूबाजूने वाईने नटलेले गाव आहे. त्यामुळे बाजार चे नाव मला हिरवे बाजार करावेसे वाटते असे गौरवोद्गार हरिभक्त परायण समाधान महाराज शर्मा यांनी काढले. नगर तालुक्यातील हिवरे बाजार येथे अयोध्येतील श्री राम लल्ला मूर्ती शीलांश स्थापनेनिमित्त आयोजित श्री राम कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यात दुसरे पुष्प गुंफतांना ते बोलत होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक, महात्मा फुले राहुरी कृषी विद्यापीठातील निवृत्त शास्त्रज्ञ नानासाहेब जाधव, नगर शहर संघ चालक डॉक्टर रवींद्र सातारकर दैनिक लोकमतचे नगर निवासी संपादक सुधीर लंके, विकास अधिकारी शाम भोकरेआदी मान्यवर उपस्थित होते. समाधान महाराज शर्मा यांनी श्री राम जन्म सोहळा हे कथेचे दुसरे पुष्प गुंफले. कथा निरुपणात ते पुढे म्हणाले की



आज रामनवमी आहे राम जन्माच्या दिवशी हिवरे बाजारात शीलांश स्थापनेनिमित्त आयोजित कथे मध्ये श्री राम जन्म होतो यापेक्षा दुसरे भाग्य ते काय. ज्याला स्वतःचं ग्राम राज्य वाटतं असाच होता तो राम म्हणून त्याला रामराज्य म्हणतात. हिवरे बाजारातली हिरवाई पाहून समाधान वाटते. वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे असं राज्य ज्या वेळेला होत ना त्या वेळेलाच म्हणायचं ग्राम राज्यात रामराज्य. जे माझे आहे ते जपले पाहिजे. तुम्हाला लागणारी लागणारी कमीत कमी किती तरी झाडे लावा त्याला जगवा त्याला मोठ करा. वृक्षारोपण मजा म्हणून करायचं नाही, साहेब आले होते आणि तीन खड्डे खोदले. संगोपन फार महत्त्वाचे आहे स्वतःच्या बाळाला जसे वाढवतो तसे वृक्षाला वाढवले पाहिजे. हिवरे बाजार मध्ये ते झाले त्यामुळे येथे ग्राम राज्यात रामराज्य ही संकल्पना रुजली हे प्रशसनीय आहे. कथेच्या दुसऱ्या दिवशी कथा ऐकण्यासाठी येणाऱ्या महिला वर्गाला पिवळा रंग देण्यात आला होता समस्त महिला वर्गाने पिवळ्या रंगाच्या साड्या परिधान केलेल्या होत्या कथेच्या तिसऱ्या दिवशी गुरुवारी लाल रंग वेश परिधान करण्यासाठी देण्यात आला आहे. दुसऱ्या पुष्पाची सांगता महारतीने करण्यात आले. गावातल्या शंभर यजमानाने सपत्नीक महाआरतीमध्ये सहभाग घेतला त्यानंतर महाप्रसाद वाटण्यात आला.

## सिद्धार्थ फाऊंडेशनच्या एक वही एक पेन व स्कूल बॅग संकलन उपक्रमास समाजातून भरघोस प्रतिसाद

**अहमदनगर । प्रतिनिधी**

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त सिद्धार्थ फाऊंडेशन वासिंद (रजि) संस्थेच्या वतीने एक वही एक पेन व स्कूल बॅग संकलन उपक्रम व अल्पोपाहार पाणी वाटप तसेच असे आपले संविधान पुस्तक मोफत वाटप कार्यक्रम १३ एप्रिल २०२४ ते १४ एप्रिल २०२४ पर्यंत रेल्वेसर्कल वासिंद पश्चिम येथे सिद्धार्थ फाऊंडेशन वासिंद संस्थेचे अध्यक्ष अशोक गायकवाड सर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

एक वही एक पेन व स्कूल संकलन उपक्रमाचे उद्घाटन वासिंद पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक एच.एस. बारवे साहेब यांचे हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करून बुद्धवंदनेने करण्यात आले.सदर उपक्रमास भिवंडी,कल्याण, शाहापूर, मुरबाड वासिंद परिसरातील दानशूर व्यक्तिमत्वांनी सहभाग घेऊन गरजू वंचित घटकातील विद्यार्थ्यांना शालेय लेखन साहित्य वस्तू स्वरूपात तसेच रोख पैशाच्या स्वरूपात धम्मदान देऊन सहकार्य केले.



एक वही एक पेन व स्कूल बॅग संकलन उपक्रमात सहभागी दानशूर व्यक्तिमत्वांना असे आपले संविधान पुस्तक सप्रेम भेट देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुकीत सहभागी सर्व भिमआनुयांना संस्थेतर्फे अल्पोपाहार ,पाणी वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत जमा झालेले शालेय लेखन साहित्य तसेच संस्थेतर्फे स्कूल बॅग गरजू वंचित घटकातील जिल्हापरिषद व आश्रम शाळेतील विद्यार्थांना जून २०२४ मध्ये शाळा सुरू झाल्यानंतर लगेचच वाटप करण्यात येणार आहे असे संस्थेचे अध्यक्ष अशोक गायकवाड सर व सरचिटणीस जगदिश गायकवाड सर यांनी सांगितले. उपक्रम यशस्वी करण्यासाठी सिद्धार्थ फाऊंडेशन वासिंद संस्थेच्या सर्व संचालकांनी विशेष परिश्रम घेतले.

## गझल अभ्यासक डॉ.अविनाश सांगोलेकर यांची चैतन्य हास्य क्लबला सदिच्छा भेट



**सांगोला । प्रतिनिधी**

मूळ सांगोलयचे भुमिपुत्र व सध्या पुणे येथे वास्तव्यास असलेले गझल साहित्याचे अभ्यासक डॉ.अविनाश सांगोलेकर यानी नुकतीच चैतन्य हास्य क्लबला भेट दिली.त्यानी योग,प्राणायाम यात भाग घेतला.सर्वांच्या आग्रहास्तव त्यानी त्यांचा जीवन प्रवास व साहित्यिक प्रवास विषद केला.सर्वाच्या आग्रहास्तव त्यानी गझल मधील विनोदी प्रकार हझल याची माहिती देवून एक विनोदी गझल सादर केली.ते सान्गोल विद्यमन्दिरचे १९७४ चे एस.एस.सी.उत्तीर्ण विद्यार्थी असुन स्नेहमेळाव्यासाठी सान्गोला आले होते.सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मधील मराठी विभाग प्रमुख म्हणून ते सेवानिवृत्त झाले असुन गझल विषयात त्यानी पी.एच.डी.मिळवली आहे.प्रा.राजाभाऊ ठोंबरे यानी आभार मानताना पुणे विद्यापिठातील त्यांच्या व डॉ.अविनाश यांच्या मैत्रीतील काही आठवणीना उजाळा दिला.तसेच या निमित्ताने डॉ अविनाश यांचे बंधू डौ.अनिल कांबळे,डॉ.कृष्णा इन्गोले यांची एकत्रित भेट झाल्याब्द्द्ल आनंद व्यक्त केला.या वेळी चैतन्य हास्य क्लब अध्यक्ष जगताप सर, ह भ प बाळासाहेब तेली,हेमंत तेली जयंत तेली, म.शं घोंगडे,प्रकाश होनराव,सुधाकर म्हेत्रे,अशोक केदार,अशोक जाधव ,भागवत पैलवान,उत्तम पाटोळे,मिलिंद पतन्गे सूभाष महिमकर भाऊसाहेब पवार,आदि उपस्थित होते

## पिलीव येथील सोमनाथ बुगड गुरुजी यांचे मरणोत्तर नेत्रदान

**सांगोला । प्रतिनिधी**

जि. प. प्रा. शाळा जरगवस्ती (पिलीव) येथील आदर्श शिक्षक व पिलीव गावचे रहिवासी श्री. सोमनाथ अरुण बुगड ( वय ४७) यांचे १६ एप्रिल रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या इच्छेनुसार नातेवाईकांनी त्यांचे मरणोत्तर नेत्रदान केले.

त्यांच्यामागे पत्नी, दोन मुली, दोन बंधु, वहिनी, पुतणे असा परिवार आहे. ते अतिशय मनमिळाऊ, हुशार व उत्कृष्ट शिक्षक होते. आपल्या कार्यकाळात आपल्या प्रभावी अध्यापनाने त्यांनी अनेक आदर्श विद्यार्थी घडवले. सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील भरीव कामगिरीमुळे त्यांना



अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. त्यांना शैक्षणिक कार्याबरोबरच शेतीची विशेष आवड होती.मरणोत्तर नेत्रदानासाठी आपुलकी प्रतिष्ठान सांगोला यांचे सहकार्य लाभले व अकलूज येथील डॉ. महाडिक व डॉ. गिरीश आर्वे यांनी नेत्रदानास मदत केली.

### आपुलकीच्या चळवळीला प्रतिसाद



सांगोल्यातील आपुलकी प्रतिष्ठान गेले पाच वर्षापासून नेत्रदान, देहदान व अवयवदान चळवळ राबवत असून आतापर्यंत तीन व्यक्तींनी नेत्रदान करून आपुलकीच्या या चळवळीला प्रतिसाद दिला आहे. मरणोत्तर नेत्रदानाने दोन अंधांना दृष्टी मिळण्यास मदत होते, तेव्हा मरणोत्तर नेत्रदानासाठी आपुलकी प्रतिष्ठान, सांगोला यांचेशी ( ९०११७०७०८० ) संपर्क साधावा

**– राजेंद्र यादव, अध्यक्ष, आपुलकी प्रतिष्ठान, सांगोला.**

## ग्रामिण रोजगार हमी योजनेतील विहिरीचे खोदकामे जेसीबी यंत्राच्या साह्याने होत असल्याने रोजगारावर उपासमारीची वेळ

**मानवत । प्रतिनिधी**

मानवत तालूक्यातील मौजे मानोली येथे मानोली ग्राम पंचायतीचे सरपंच व रोजगार सेवक यांच्या संगणमताने विहिरीचे यंत्राच्या साह्याने खोदकामे करण्यात येत असून त्यामूळे कामगारावर उपारमारीचे संकट ओढावले असल्याची तक्रार गावातील नागरीकांनी मानवत पंचायत समितीच गटविकास अधिकारी यांच्याकडे एका निवेदना द्वारे करण्यात आली.

सविस्तर वृत्त असे की,राज्यशासनाने मागेल त्याला विहिर दिली असून त्यामूळे ग्रामिण रोजणदारी कामगारांना काम मिळून त्यांचा रोजगाराचा प्रश्न मिटेल असे असतांनाही मानोली येथे ग्राम रोजगार सेवक व सरपंच यांच्या मनमानी व संगणमताने मजूरा ऐवजी यंत्राने विहिरीचे खोदकामे करण्यात येत असल्याची तक्रार गटविकास अधिकारी यांच्याकडे नागरीकांनी केल्याने खळबळ ऊडाली. म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत विहिर खोदकामास मजुरांच्या सहाय्याने न करता जेसीबीने करत असले मूळे मजूरावर उपासमारीची वेळ आली असल्याची तक्रार संतोष सदाशिव शिंदे, सुरेश बालासाहेब मांडे मानोली येथील रहिवाशी असून मौजे मानोली येथील ग्रामरोजगार सेवक व सरंपच व काही एजंट हे एकमेकांशी संगणमत करुन मजुरांच्या सहाव्याने विहिरीचे खोदकाम न करता शेतक-यांकडून अतिरीक्त पैसे घेवून जेसीबीच्या सहाय्याने खोदकाम करीत आहे. त्यामुळे मजुरांच्या हाताला काम मिळत नसल्यामुळे, मजुरांवर उपासमारीची वेळ येत आहे. तसेच काही वयोवृध्द मजुरांची देखील नावे लेबरकार्ड मध्ये टाकण्यात आलेलीआहेत. येथील ग्रामरोजगार सेवक, सरपंच व काही एजंट यांची चौकशी करुन योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी व मजुरांना रोजगार मिळवून देण्यात यावा ही नम्र विनंती. अन्यथा आपल्या कार्यालया समोर दिनांक ०२/०५/२०२४ रोजी आत्मदहन आंदोलन करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी व होणा-या सर्व परिणामाची संपुर्ण जबाबदारी आपल्या लोक कल्याणकारी पंचायत समिती प्रशासनावर राहिल. असा ईशारा दिलेल्या निवेदनाद्बारे संतोष सदाशिव शिंदे, सुरेश बाळासाहेब मांडे यांनी प्रशासनाला दिला आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .